# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१०/०९/१७

## दि.०९/०९/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३५८/१७,भादविक २७९,३०४(अ),३३८,४२७,मोव्हे.१८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | पो.हवा. के कें कांबळे, कोंढवा पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात वाहन चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०९/१७ रोजी १७/०० वा. खडी मशिन चौक,कोंढवा पो स्टे पुणे शहर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी प्रकाश विलास माने,वय-३५,रा. इस्लामपुर यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन, अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. के.कें.कांबळे ९९२३१०७४५१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८८२/१७,भादविक ४९८(अ),३०६,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | सौ.जयश्री जयस्वाल,वय-५६,रा.गोदिया |
| **आरोपी** | १.अमरेश भारतभुषण जयस्वाल (अटक) २.एक महिला,रा.रवि गार्डन सोसा.मांजरी,हडपसर, पुणे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/१२/१३ ते दि.०६/०९/१७ रोजीचे कालावधीत रवि गार्डन सोसायटी,मांजरी,हडपसर, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील महिला सौ.आंकाक्षा अमरेश जयस्वाल,वय-३१ वर्षे हीचे लग्न तीचा पती अमरेश भारतभुषण जयस्वाल या इसमा बरोबर होवुन,ती त्याचेबरोबर सासरी नांदत असताना, तीचा पती व इतर महिला यांनी आपसात संगनमत करून,तीचे लग्नात मानपान कमी केला व हुंडा कमी दिल्याचा कारणावरुन तीस टोचुन बोलुन,तीचा शारिरीक व मानसिक छळ करून, सौ.आकांक्षा जयस्वाल हिस आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. खोपडे |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७३८/१७,भादविक ३०६, |
| **फिर्यादी** | राजेंद्र कांबळे,पोलीस उप-निरीक्षक, येरवडा पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | अल्ताफ अब्दुल शेख,वय-२१ वर्ष,रा.स.नं.१०३,जयप्रकाश नगर,येरवडा,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०९/२०१७ रोजी १५/२० वा. शास्त्रीनगर चौकात मोठया झाडाचे खाली उत्तर बाजुचे फुटपाथ लगत रोडवर येरवडा,पुणे |
| **तपशिल** | दि.०९/०९/२०१७ रोजी १५/२० वा.चे पुर्वी शास्त्रीनगर चौकात मोठया झाडाचे खाली उत्तर बाजुचे फुटपाथ लगत रोडवर यातील नमुद इसम अल्ताफ अब्दुल शेख याने हंसराज धोंडीराम कुटे,वय-४५ वर्ष,रा.मुं.पो.टाकळी-काझी,जि.अहमदनगर यास अज्ञात कारणावरून शिवीगाळ व हाताने मारहाण करीत असताना,त्याचवेळी मिल्ट्रीची गाडी त्यांचे जवळुन पास होत असताना अल्ताफ शेख याने समोरून मोठी गाडी येत आहे, व हंसराज कुटे हा सदर गाडी खाली गेल्यास,त्याचा मृत्यू होईल याची त्यास जाणीव असतानादेखील त्याने हंसराज कुटे यास धक्का दिल्याने तो मिल्ट्री गाडीचे मागील चाकाखाली पडुन ते चाक हंसराज याचे अंगावरून गेल्याने,ते जखमी होवुन मयत झाले आहे. |
| **त.अंमलदार** | सहायक पोलीस निरीक्षक, एस.व्हि.बोबडे ९८२३०७९५९३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ५२६/१७,भादविक ३०७,३२३,५०४,१४१,१४३,१४७,१४८ |
| **फिर्यादी** | गणेश टोपणे,वय-३० वर्षे,रा. मोरया कॉलनी,काळेवाडी,पुणे |
| **आरोपी** | १.वैभव नाझरकर,रा.काळेवाडी,पुणे २.बंडया सरग ३.आकाश ऊर्फ मॉन्टी सातपुते ४.लोकेश वायकुळे ५.प्रियेश चंदनशिवे ६.लखन डोगरे,रा.सर्व सदर व त्याचे तीन ते चार साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०९/२०१७ रोजी २१/४५ वा. नवीन बी.आर.टी.रोडवर कोठेश्वर पेट्रोल पंपाचे पाठीमागे काळेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्याचे राहते घराजवळ थांबले आसताना,त्यांचा मित्र प्रविण शिर्के व अक्षय फाळके हे सदर ठिकाणी येवुन,फिर्यादी यांना सांगितले की प्रियेश चंदनशिवे याचेसोबत भांडणे झाली असुन,ती मुले बीआरटी रोड,काळेवाडी,पुणे येथे असुन,तु आमचे सोबत येवुन आमचे भांडण मिटव असे सांगितल्याने,फिर्यादी हे त्यांचेसह नमुद ठिकाणी आले असता,तेथे राकेशचे ओळखीचे यातील नमुद इसम हे उभे होते. तेव्हा त्याना फिर्यादी यांनी तुमचे भांडणे मिटवा असे सांगत असताना,सदर इसमांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करुन बीआरटी रोडचे कठडयावर ठेवलेले लोखंडी कोयते हातात घेताच फिर्यादी यांचे मित्र पळुन जात असताना राकेशला खल्लास करा याला सोडु नका असे बोलताच,सदर इसमांनी त्यांचेकडील लोखंडी कोयत्याने जीव घेण्याचे उद्देशाने राकेश टोणपे याच्या डोकयात व गळयावर वार केला. तसेच उजव्या पायाचे मांडीवर वार केल्याने तो जखमी अवस्थेत जमिनीवर पडल्याने त्याला सर्व आरोपी मिळुन हाताने व लाथा-बुक्यांनी मारहान केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एच.व्ही.माने ७५०७५४२६३१ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे २६८/१७,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | गहीनीनाथ डोके,वय -३७ वर्ष,रा.सुखसागरनगर,कात्रज,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०८/२०१७ रोजी १७/१५ वा. ते दि.०१/०९/२०१७ रोजी सकाळी १०/३० वा.पर्यंत तसेच दि.०५/०९/२०१७ रोजी ते दि.०७/०९/२०१७ रोजी सकाळी १०/३० वा.चे दरम्यान पन्नालाल लुंकड चॅरिटी ट्रस्ट संचालित मोहनलाल लुंकड माध्यमिक विद्यालय,तळजाई-पद्मावती,सहकारनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,पन्नालाल लुंकड चॅरिटी ट्रस्ट,संचालित मोहनलाल लुंकड माध्यमिक विद्यालया मधील संगणक विभाग,पन्नालाल लुकंड ट्रस्टचे कार्यालय, तसेच शांताबाई लुंकड बालसदन हे कार्यालय कुलुप लावुन बंद असताना, कोणीतरी अज्ञात इसमाने नमुद शाळा/संस्थेच्या कार्यालयाची कुलुपे कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,शाळा/संस्थे मधील कपाटातील दोन संगणक, यु.पी.एस.खुर्च्या,स्वयंपाकाची भांडी,वजनकाटे तसेच शैक्षणिक महत्वाची कागदपत्रे असा एकुण ६०,०००/- रु किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. सी.एम.मोरे ९८७०३२७७०० |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २९३/१७,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | श्रीमती.निलु मुळचंदाणी,वय-६८ वर्षे,रा.शंकरशेठ रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०९/२०१७ रोजी स.११/०५ वा.ते दु.१२/४० वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे घराचे पाठीमागील दरवाजा लॉक न करता,अलगद लावला असतांना,कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्या उघडया दरवाजा वाटे आत प्रवेश करून,घराचे मास्टर बेडरुम समोरील दुसरे बेडरुम मधील लाकडी कपाटाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यामधील रोख १३ हजार व सोन्याचा राणीहार असा एकुण २,३४,२२५/- रू किमतीचा ऐवज चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. भोसले ९५२७३१७५७० |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३१५/१७,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | चैत्राल शिंदीकर,वय-३१,रा.बिबवेवाडी कोंढवा रोड,कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | १.एम.जी.प्रोपर्टीजचे मालक-मोहन जयंता गायकवाड,रा.हरेकृष्णा पार्क,धानोरी रोड,पुणे व कामगार- २. अभय भामे ३.विकास मोरे ४.एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे डिसेंबर २०१४ ते ऑगस्ट २०१७ रोजीचे कालावधीत शॉप नं.एफ-३,तळमजला,परमार ट्रेड सेंटर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद एम.जी.प्रोपर्टीजचे मालक- मोहन गायकवाड व इतर कामगार इसम व महिला यांनी आपसात संगनमत करून,नमुद कालावधीत फिर्यादी व इतर १६ साक्षीदार यांना स्वस्त दरात सुलभ हप्त्याने जमीन उपलब्ध करून देतो असे सांगुन,सदरची जमीन तुम्ही विकत घेतल्यास ती जमीन भाडेतत्वावर घेवुन तुम्हास दरमहा त्याचे भाडे देण्यात येईल असे खोटे सांगुन,फिर्यादी यांचेकडुन १ लाख रूपये व इतर साक्षीदारांकडुन ५३ लाख ४० हजार रूपये असे सर्व मिळुन एकुण ६३,४०,०००/- रूपये रोख व इतर मार्गान स्विकारून फिर्यादी व साक्षीदार यांना कोणतीही जमीन न देता त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. चव्हाण ९०११३२८०९० |
| **८** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चिंचवड पो स्टे २३८/१७,भादविक ४२०,४६८,४७१,३४ |
| **फिर्यादी** | नरेश सिंह,वय-२९,रा.पिंपळे-सौदागर,पुणे |
| **आरोपी** | बँकेचे हाऊंसिंग फायनान्सचे व्हेरिफिकेशन करणारे कामगार- १.राहुल लोहार २.कर्ज काढणारे अनोळखी इसम ३.नॉमीनी असलेली एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०२/१६ ते माहे मार्च २०१७ रोजीचे कालावधीत घेवला कॉम्प्लेक्स,तिसरा मजला येथील राष्ट्रीयकृत बँकेचे हाऊंसिंग फायनान्सचे ऑफीस मध्ये पिंपरी चिंचवड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील अनोळखी इसमाने फिर्यादी यांचे नावावरील पॅनकार्ड,पत्ता पुरावा,पगार स्लीप वगैरे कागदपत्राची छायांकीत प्रत कोठुन तरी मिळवुन फिर्यादी यांची संमती न घेता,त्या कागदपत्राचे बनावटी करून त्याचा वापर करून,बँकेकडुन ४२ लाख रूपयाचे कर्ज घेवुन,त्यासाठी नॉमीनी असलेली एक महिलेचा फोटो लावुन,फिर्यादी यांचे नावाचे खोटे कागदपत्रे घेवुन,आयीसीआयसीआय बँक शिवाजीनगर येथील शाखेत खोटे खाते उघडले. फिर्यादी यांचे पॅनकार्ड व ऑफीस कार्डवर अनोळखी इसमाने त्याचा फोटो लावुन फिर्यादी यांचे नावाने बनावट पॅन कार्ड व आयडी कार्ड बनवुन फिर्यादी यांचे नांवावर कर्ज घेतले. सदर घेतलेल्या कर्जामधील ४१ लाख रूपये रक्कम थकीत ठेवुन फिर्यादी यांचे सी-बील स्कोर खराब करून,बँकेतील कामगार राहुल लोहार याने फिर्यादी यांचे खोटी व्हेरिफिकेशन करून अनोळखी इसमास कर्ज दिले आहे. (सदर अनोळखी इसमा बाबत काही माहिती मिळाली नसल्यामुळे त्यांनी आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. केदार |
| **९** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २०२/१७,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | विकासकुमार प्रसाद,वय -२७,रा.पिपळे-सौदागर,पुणे |
| **आरोपी** | शेहबाज सैय्यदअली सैय्यद अहमद अली,वय-२२,रा.हिंगणेघाट,जि.वर्धा (अटक) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०९/१७ रोजी १७/३० वा.दगडुशेठ हलवाई मित्र मंडळ,बुधवार पेठ पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दगडुशेठ हलवाई गणतपी मंदिराचे दर्शन घेत असताना,यातील नमुद इसमाने,गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे जवळील १० हजार रू किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. राजन शिंदे ८९८१०८०४८१ |
| **१०** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २०३/१७,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | राहुल अमोलीक,वय-२५ वर्षे,रा.इद्रायणीनगर जांभुळवाडी,दत्तनगर कात्रज,पुणे |
| **आरोपी** | शेहबाज सैय्यदअली सैय्यद अहमद अली,वय-२२,रा.हिंगणेघाट,जि.वर्धा (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०९/१७ रोजी १७/०० वा.दगडुशेठ हलवाई मित्र मंडळ,बुधवार पेठ, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दगडुशेठ हलवाई गणतपी मंदिराचे दर्शन घेत असताना,यातील नमुद इसमाने,गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे जवळील १० हजार रू किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. राजन शिंदे ८९८१०८०४८१ |
| **११** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २०४/१७,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | आकाश शेट्टी,वय-२४ वर्षे,रा.सोमवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | शेहबाज सैय्यदअली सैय्यद अहमद अली,वय-२२,रा.हिंगणेघाट,जि.वर्धा (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०९/१७ रोजी स.१०/३० वा.सिटी पोस्ट ते बेलबाग चौक दरम्यान बुधवार पेठ, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दगडुशेठ हलवाई गणतपी मंदिराचे दर्शन घेत असताना,यातील नमुद इसमाने,गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे जवळील १४ हजार रू किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. राजन शिंदे ८९८१०८०४८१ |
| **१२** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २०५/१७,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | अशोक चव्हाण,वय-२८ वर्षे,रा.वाकडेवाडी,पुणे |
| **आरोपी** | शेहबाज सैय्यदअली सैय्यद अहमद अली,वय-२२,रा.हिंगणेघाट,जि.वर्धा (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०९/१७ रोजी रात्रौ ००/३० वा. दगडुशेठ हलवाई गणतपी मंदिरा समोर बुधवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दगडुशेठ हलवाई गणतपी मंदिराचे दर्शन घेत असताना,यातील नमुद इसमाने,गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे जवळील १० हजार रू किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. राजन शिंदे ८९८१०८०४८१ |
| **१३** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २०७/१७,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | अमित यादव,वय-२२ वर्षे,रा.गणेशखिंड रोड,खैरवाडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०९/१७ रोजी २१/०० वा.दगडुशेठ हलवाई गणतपी मंदिरा समोर बुधवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दगडुशेठ हलवाई गणतपी मंदिराचे दर्शन घेत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे जवळील १२ हजार रू किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.ना. एस.एस.कुटे ९८८१४६५५१६ |

१४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २०८/१७,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | विक्रम भिडे,वय-३५ वर्षे,रा.एकतानगरी,सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०९/१७ रोजी सकाळी ११/४५ वा. दगडुशेठ हलवाई मंदिरा समोर बुधवार पेठ शिवाजीरोड पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दगडुशेठ हलवाई गणतपी मंदिरा समोर दर्शन घेत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे गळयातील १५ हजार रू किमतीची चैने चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.ना. के.बी.आढाव ८८८८६३२३३८ |

## दि.१०/०९/१७ रोजी रात्रौ ००/०० वा. ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे २६२/१७,भादविक ३०७,३४,महा.पो.अधि.३७(१)(३)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | लखन खंडाळे,वय-२३,रा.अपर इंदिरानगर,बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपी** | १.मनोज खाडे,रा.गंगाधाम,पुणे २.भोला बनसोडे,रा.अंबिकानगर,पुणे ३.भज्या निकाळजे,रा. काकडे वस्ती,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०९/१७ रोजी २१/०० वा.स.नं.६५८,शिवरायनगर,अपर इंदिरानगर,बिबवेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे रिक्षात बसलेले असताना,यातील नमुद इसमांनी गाडया तोडफोडीचे कारणावरून अंकीत केंजळे याचेविरूध्द गुन्हा दाखल केल्याचा राग मनात ठेवुन त्यांचे जवळील तलवारीने जीवे ठार मारण्याचे उद्देशाने,फिर्यादी यांचे डावे हाताचे पोटरीवर पाठीमागील बाजुस वार करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जयवंत जाधव |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**